


नोस्टाल्जिया
प्रशांत
दांडेकर
EVEREST

# नोस्टाल्जिया

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नोस्टाल्जिया

लेखक

## प्रशांत दांडेकर

# नोस्टाल्जिया


लेखक: प्रशांत विजय दांडेकर

इमेल - prashant.dandekar@rediffmail.com

मोबाईल - ९८२१९४७४५७

पत्ता - २ जानकी कुंज

महादेव विष्णू पांडालोस्कर मार्ग

विले पार्ले - पूर्व - मुंबई - ४०००५७



या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २१ जुलै २०२० (श्रावण आरंभ)**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे- आवश्यकआहे.

ओळख



प्रत्येकाचे कोणीतरी आवडते लेखक किंवा कवी असतातच; माझ्यापुरते बोलायचे झाल्यास शिवाजी सावंत यांचे मृत्युंजय हे पुस्तक नॉस्टॅलजियाचे फ़ीलिंग निर्माण करते.

इतरांची पुस्तके वाचता वाचता मला देखील लिहिण्याची उर्मी आली; अनेक वर्षे मी **लोकसत्ता, आपलं महानगर, प्रहार व मुंबई चौफेर या वृत्तपत्रांमध्ये** लिहीत आहे; बालसाहित्य, व्यवस्थापन क्षेत्रामधील सॉफ्ट स्किल्स, चित्रपट सृष्टीमधील व्यक्तिमत्त्वांच्या मुलाखती व जगात साजऱ्या केल्या जाणाऱ्या विविध दिवसांबद्दल लिहीत असताना लेखक म्हणून मी देखील प्रगल्भ होत गेलो. आजवर ५०० लेखांचा टप्पा मी कधी ओलांडला हे मला देखील कळलेच नाही.

**‘लोकप्रभा’ सारख्या साप्ताहिकांमध्ये** मी २०१४ मध्ये मराठी भाषेचे सौंदर्य व २०१६ मध्ये कॉर्पोरेट मॅनेजमेंट या

विषयांवर वर्षभर लेखमाला लिहिल्या तर **पोलिसांचे मासिक 'दक्षता'** मध्ये देखील अडीच वर्षे सातत्याने लेखन केले.

व्यवस्थापनामधील किचकट इंग्रजी संज्ञा मुलांना सहज कळाव्यात म्हणून मी **'व्य'** नावाचे व्यवस्थापन क्षेत्रावर एक पुस्तक लिहिले ज्याचे प्रकाशन तत्कालीन शिक्षण मंत्री श्री विनोद तावडे यांच्या हस्ते करण्यात आले होते.

भारतरत्न लता दीदी यांनी २०१९ मध्ये वयाची ९० वर्षे पूर्ण केली त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीवर भाष्य करणारे **'लता ९०'** हे पुस्तक रवींद्र नाट्य मंदिरामध्ये प्रकाशित करण्यात आले; या पुस्तकाचे उदघाटन १० मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले ज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भावगंधर्व हृदयनाथ मंगेशकर, सुलोचना दीदी, जॅकी श्रॉफ, संगीतकार कल्याणजी आनंदजी अशांचा समावेश होता; या पुस्तकामध्ये मी मान्यवरांच्या घेतलेल्या १३ मुलाखती /लेख समाविष्ट करण्यात आले होते; आशा पारेख, वैजयंतीमाला व हेमामालिनी या नृत्यांगना, प्रसिद्ध पटकथा लेखक सलीम खान, शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे इत्यादींच्या मुलाखती घेत असताना या पुस्तकाची प्रस्तावना भारतरत्न सचिन तेंडुलकरांकडून घेण्याचे सौभाग्य देखील मला मिळाले.

सध्या मी तीन पुस्तके लिहून पूर्ण केली आहेत जी योग्य प्रकाशकाच्या शोधात आहेत; **भारतीय पक्षी, भारतीय फुले व लैंगिक अत्याचार प्रतिबंध आणि महिला सक्षमीकरण** या तीन विषयांवर ही पुस्तके आहेत.

आदिवासी क्षेत्रातील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व आरोग्य संगोपनासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रसिद्ध व्यक्तिमत्वांवर एक कॉफी टेबल बुक काढण्याचे ड्रीम प्रोजेक्ट माझ्या मनात आहे; त्यासाठी आपल्या सारख्या रसिकांच्या भरघोस प्रतिसादाची अपेक्षा आहे.

प्रशांत दांडेकर

९८२१९४७४५७

# ई साहित्यने प्रकाशित केलेली प्रशांत दांडेकर लिखित पुस्तके


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mehfil_e_prashant.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mehfil_e_prashant_2.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/maifil_e_prahsnt_3.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mehfil-e-prahsnt-4.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mehafil_e_prashant_5.pdf















# मनोगत

सध्या करोनाच्या दहशतीमुळे सर्व जणांवर  स्वतःला घरात बंदिस्त करून घ्यायची नामुष्की ओढविली आहे; यामध्ये सर्वात मोठी मानसिक कुचंबणा कोणाची झाली असेल तर ज्येष्ठ नागरिकांची; करोनामुळे ज्येष्ठ नागरिकांचे मॉर्निंग वॉक, संध्याकाळचा गप्पांचा कट्टा किंवा घरकामाला येणाऱ्या नोकरांसोबतच्या शिळोप्याच्या गप्पा सर्वच काही बंद झाले आहे त्यामुळे भावनांचा निचरा होण्याचे सर्वच मार्ग खुंटले आहेत. मध्यमवयीन वर्गांच्या नोकऱ्यांवर गदा आल्याने ते देखील नैराश्याच्या खाईमध्ये लोटले जात आहेत; करोनाच्या मृत्युदरामुळे, भारतीय सणांचे आनंदपर्व साजरे करायला मिळत नसल्यामुळे एकूणच जनमानसामध्ये सकारात्मक सांगण्यासारखे काहीच उरले नाही.

अशावेळी लोकांचा मूड बदलण्यासाठी भूतकाळातील रम्य आठवणींना उजाळा देणे श्रेयस्कर असते; या उद्देश्यपुर्ती साठीच मी नॉस्टॅल्जिया या पुस्तकाची कल्पना घेऊन रसिकांसमोर आलो आहे.

काही जुन्या आठवणी या कस्तुरीमृगासारख्या असतात ज्या आपल्या उर्वरित आयुष्याला कायमचे सुगंधित करतात तर काही आठवणी वारुळातून निघालेल्या लाल मुंग्यांसारख्या चावून चावून बेजार करून टाकणाऱ्या असतात; आपण मात्र या पुस्तकातून प्राजक्ताचा सडा वेचणार आहोत ज्यामुळे करोनाचे मळभ दूर होऊन पुन्हा एकदा आपले वर्तमान प्रफुल्लित होणार आहे. या पुस्तकामध्ये माझ्यासाठी नॉस्टॅलजिया निर्माण करणाऱ्या गोष्टींबद्दल लिहिले आहे; पण माझी अशी अपेक्षा आहे की आपण सर्वांनी देखील या गोष्टींशी निगडित आपल्या आठवणी सर्वांशी शेअर करून वाचकांचा आनंद द्विगुणित करावा.

नॉस्टॅलजिया हा कन्सेप्ट आपल्याला आवडल्यास दुसरा भाग लिहिण्याचा देखील माझा मानस आहे; त्यामुळे त्यासाठी विविध विषय सुचविल्यास दुसरा भाग हा अजून वाचकाभिमुख होईल; आपल्या प्रतिक्रियांच्या प्रतिक्षेमध्ये आतुर असलेला –

----- प्रशांत दांडेकर.

९८२१९४७४५७

# अर्पण पत्रिका

नॉस्टॅल्जिया हे पुस्तक कोणाला अर्पण करायचे असा जेव्हा विचार मनात आला तेव्हा अनेकांची नावे डोळ्यासमोर आली; त्यात माझे असंख्य मित्र होते; अनेक सुरेख चित्रपटगीतांचे गीतकार होते व काही निर्जीव व तरीदेखील खूप काही बोलणाऱ्या वस्तू होत्या; निसर्ग ज्याची विविध रूपे आपल्याला मोहित करतात त्याला देखील हे पुस्तक अर्पण करणे संयुक्तिक ठरेल.

माझ्या आजोळच्या समुद्राला (उंबरगाव), माझ्या जानकी कुंज बिल्डिंगच्या गच्चीला, गुलजार सारख्या प्रतिभावंत गीतकाराला हे पुस्तक अर्पण करताना मला खरंच आनंद होत आहे कारण गुलज़ारजींच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास नॉस्टॅलजिया म्हणजे 'मेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा है, सावन के कुछ भीगे भीगे दिन रखे हैं; और मेरे एक ख़त में लिपटी रात पडी हैं, वो रात बुझा दो, मेरा वो सामान लौटा दो.'

# Contents


प्रस्तावना ........................................ 14

सायकल ........................................ 16

पाऊस ........................................ 23

गच्ची ........................................ 30

समुद्र ........................................ 37

मैत्री ........................................ 43

पियानो ........................................ 50

पत्र ........................................ 57

ट्रेन ........................................ 64

# प्रस्तावना

प्रत्येकाच्या आयुष्यात नॉस्टॅलजिया निर्माण करणाऱ्या अनेक गोष्टी असतात कधी त्या गोष्टी निर्जीव असतात तर कधी सजीव; या गोष्टींशी आपले ऋणानुबंध इतके घट्ट असतात की आपले जीवन त्या गोष्टींशिवाय अपूर्णच असते.

या पुस्तकामधून मी अशाच काही गोष्टींबद्दल माझे अनुभव शेअर करणार आहे; अशा करतो की माझ्या आठवणी वाचून तुम्हाला देखील आपले जुने, हृद्य, सोनेरी पण आता हातातून निसटून गेलेले क्षण सापडतील.

# नॉस्टॅल्जिया

लेखक : प्रशांत दांडेकर

# सायकल

आमच्या तरुणपणी सायकल म्हणजे एक विस्तृत भावविश्व होते; सातवी इयत्तेची स्कॉलरशिप मिळाल्यावर मला सायकल मिळाली; त्याकाळी सायकल म्हणजे मैत्री घट्ट करणारे एक साधन होते; मित्रांबरोबर सायकल वरून फिरायला जाताना भारी मजा यायची.  आमच्यावेळी सायकल काहींना आपल्या प्रेमापाठी हात धुवून मागे लागताना देखील उपयोगी पडायची; त्याकाळी सिनेमामध्ये नायक व नायिका सायकलवरून लॉन्ग ड्राईव्ह ला जायचे. या लॉन्ग ड्राईव्ह वरून मला चटकन आठवणारी दोन गाणी म्हणजे एक चॉकलेट हिरो देवानंद व त्याकाळची हॉट नायिका मुमताज यांचे **'हे मैंने क़सम ली'** हे गाणे व विनोद खन्ना - सायराबानो चे **'नैनों में दर्पन है दर्पन में कोई देखूं जिसे सुबह शाम'**; आजकाल जेव्हा विक्रमगड ला

जाणे होते तेव्हा आदिवासी नवरा बायको असे सायकल वरून जाताना दिसतात व डोळ्यासमोर ही गाणी लगेच तरळतात.

आपल्या प्रेमाचा पाठलाग करायला सायकल कशी वापरायची त्याचे शास्त्रशुद्ध प्रात्यक्षिक दाखवले ते देव आनंद व नूतन ने; गाणे अर्थातच **'माना जनाब ने पुकारा नहीं'** सायकल म्हटले की आठविणारे अजून एक हटके गाणे म्हणजे दोन सीट्स असलेल्या लांबलचक सायकलवरून शान चित्रपटामध्ये अमिताभ व शशी कपूर ने आपल्या प्रेमिकांसोबत केलेले धसमुसळे फ्लर्टींग; **'जानू मेरी जान'** हे गाणे आज ही ऐकताना व पाहताना सदाबहार वाटते.

**'सुनो सुनो मिस चॅटर्जी मेरे दिल का मॅटर जी'** हे धमाल गाणे जॉनी वॉकर वर चित्रीत आहे ज्यात तो सायकलवर बसून ट्रॅम मधून जाणाऱ्या आपल्या प्रेयसीला छेडीत असतो; जेव्हा मी पहिल्या नोकरीनिमित्त

बालीगंज ला होतो तेव्हा ट्रॅम बघून मला हे गाणे हमखास आठवायचे.

त्याकाळी सायकल फक्त मैत्रीच जोपासायला उपयोगी पडायची नाही तर शत्रुत्व निभवायला देखील; हॉकी स्टिक सोबत सायकल चेन ने हाणामारी करणे हा त्याकाळी मवाली व दादा लोकांचा धंदा असायचा. ‘मेरे अपने’ चित्रपटामध्ये विनोद खन्ना व शत्रुघ्न सिन्हाच्या टोळक्यांमध्ये हाणामारी होताना ही सायकल चेन दिसली होती; त्याकाळी एकमेकांचा गळा आवळताना हमखास सायकल चेन वापरली जायची.

पण सायकल ला ग्लॅमर मिळवून दिले ते आमिर खान व पूजा बेदी ने 'जो जिता वो सिकंदर' चित्रपटामध्ये मध्ये; **'पहला नशा, पहला ख़ुमार नया प्यार हैं नया इंतज़ार'** या गाण्यात सायकलचा किती सुरेख उपयोग झाला आहे; या चित्रपटामध्ये दोन ग्रुपमधील सायकल शर्यतीचा थरार दाखविला आहे; पूर्वी 'प्रॉमिस टूथपेस्ट'

प्रायोजित मुंबई पुणे सायकल शर्यत असायची या शर्यतीमध्ये **'घाटाचा राजा'** हा 'किताब पटविण्यासाठी खेळाडूंमध्ये जबरदस्त चुरस असायची.

सायकल म्हटले की आम्हाला आठवतो ते आमच्या बालपणी सायकल वरून भोपू वाजवित येणारा इडली वाला अण्णा; त्याकाळी चाकू, सूरी ला धार काढणारा चाकूवाला; पोष्टाची तार घेऊन येणारा पोष्टमन देखील सायकलस्वार होऊन यायचा.

शोभा खोटे ही हास्य अभिनेत्री प्रोफेशनल सायकल पटू होती; तिच्या या कौशल्याचा 'अनाडी' चित्रपटामध्ये दिग्दर्शकाने छान उपयोग करून घेतला होता; गाण्याचे बोल होते, **'बनके पंछी गाये प्यार का तराना'** या गाण्याच्या शेवटी सायकल वर असलेल्या नायिकेची (नूतन) व नायकाची (राज कपूरची) टक्कर होते; असे प्रेमाच्या पहिल्या भेटीचे क्षण प्रत्यक्षात काही जणांच्या आयुष्यात आले देखील असतील.

सायराबानो चे पडोसन चित्रपटामधील **'मैं चली मैं चली, देखो प्यार की गली'** हे गाणे देखील डोळ्यांसमोर आले नाही तरच नवल!

माझ्या पुरते बोलायचे झाल्यास मला आठवतात ते दिवस जेव्हा मित्रांसोबत मी नव्यानेच झालेल्या सहार विमानतळाचा सायकलवरून फेरफटका मारायला जायचो; आठवतात ते दिवस जेव्हा पावसाळयाच्या आधी सायकल गंजू नये म्हणून ग्रीस लावण्याचा उद्योग. आमचा एक मित्र त्याच्या मैत्रिणीला चोरून चोरून भेटायचा व आम्ही दोघे तिघे त्याचे सोबती बनून सायकलवरून मागे मागे फिरायचो; उद्देश 'गोंद्या आला रे' सारखी भूमिका वठवायला; रस्त्यावर धोका असेल तर मित्राला सावध करायला; आता ते इतक्या वर्षांनी आठवून पण मजा येते.

सायकल बाबत एक उदास आठवण देखील आहे माझी; आमच्याकडे एक ससा होता तो अंगणात

खेळताना पार्क केलेल्या सायकलच्या स्पोक मध्ये अडकला; क्षणार्धात माझ्या आईने त्याला सोडविले देखील पण तो निपचितच झाला; आम्ही डॉक्टरकडे घेऊन गेलो पण ते म्हणाले ससा भित्रा प्राणी आहे; त्याला काहीच इजा झाली नव्हती पण स्पोक मध्ये अडकून घाबरल्याने त्याला हार्ट अटॅक आला व तो मेला.

डहाणू नरपड ला समुद्र किनाऱ्याला अगदी समांतर रोड आहे; अशा एखाद्या रोड वर प्रेयसीला सायकलवरून डबलसीट घेऊन जायला मला कधीही आवडेल. असाच एक रोड माझ्या स्मरणात आहे, मॅटलॉक, इंग्लंड चा; जिथे उंच डोंगर व त्या सोबत खोल दरीतून वाहणारी नदी व या दोघांना समांतर जाणारा वळणदार रस्ता. तिथे देखील अशी रोमँटिक राईड घ्यायला मजाच येईल ना! आता तुम्ही म्हणाल प्रेयसीच का बायको का नको तर प्रेयसीला असे घेऊन फिरल्यावर तीच पुढे जाऊन बायको होणार ना!

गच्ची असो की सायकल; या गोष्टी प्रेमाच्या हलक्या फुलक्या आठवणी आयुष्यात नकळत घेऊन येतातच;

चला तर मग शेअर करा तुमच्या आठवणी! आपल्या बंगाली मित्रांना सायकल रिक्षा देखील आठवत असेल कारण माणसांनी ओढल्या जाणाऱ्या या सायकल रिक्षा आज देखील कोलकाता शहरात पाहायला मिळतात; पण त्यांच्याबद्दल आपण पुढे कधीतरी सविस्तर पणे बोलू.

# पाऊस

पाऊस हा नेहमीच रोमँटिक असतो जो पर्यंत तो रौद्र रूप धारण करत नाही; सगळयांप्रमाणेच माझे देखील पावसाशी प्रथम नाते जडले ते कागदी होड्यांच्या रूपात; आमच्या जुन्या बिल्डिंगमध्ये नारळाची अनेक झाडे होती त्यामुळे नारळाच्या पेंड्यांना होडीच्या आकाराचे जे आवरण असते त्याच्यापासून आई मला टिकाऊ होडी बनवून द्यायची. त्याला स्क्रू ड्राइव्हर ने भोक पाडून अगदी कापडी शीड देखील लावायचो पण कागदी होडीची सर त्याला नसायची कारण कागदी होडी प्रमाणे ती पाण्याच्या प्रवाहात वाहून जायची नाही; अंगणातील ओहोळातून निघालेली होडी गटाराच्या पाण्यात जो पर्यंत पोहोचायची नाही तोपर्यंत होडी बनविण्याचे सुख वाटायचेच नाही.

होडीवरून मन उडाले की मग छत्री असून देखील ती बाजूला सारून मित्रांसोबत साचलेल्या पाण्यात उड्या मारत भिजायची मजा सुरु व्हायची पण पाऊस खरा उमगायला लागतो तो पौगंडावस्थेमध्ये; हिंदी चित्रपटांनी पाऊस इतका रोमँटिक करून ठेवला आहे की प्रियकर व प्रेयसी एकाच छत्रीमध्ये पावसात भिजले नाही तर तो जणू प्रेमाच्या खेळातील फाउलच! राज व नर्गिस ने या पावसालाच जणू आपल्या प्रेमाने चिंब भिजवून टाकले होते; गाणे अर्थातच; **'प्यार हुआ, इक़रार हुआ है;प्यार से फिर क्यों डरता है दिल'**

पण पावसाच्या पाण्याला आग लावावी तर आपल्या मधुबालानेच; **'एक लडकी भिगी भागीसी'** या गाण्यात तिच्या मधाळ शरीरावरुन ओघळणारे पावसाचे थेम्ब म्हणजे प्रेमाची खुमारी वाढवणारे मदिरेचे जामच जणू!

मुंबईचे पावसातील दर्शन घ्यायचे असेल तर अमिताभ व मौशमीचे **'रिमझिम गिरे सावन'** हे गाणे अनुभवावे; खरे तर त्याकाळी मौशमीचे अमिताभवर प्रेम जडले होते पण अमिताभ तर आधीच जया मध्ये गुरफटला होता. प्रत्यक्ष जीवनात नाही तरी सिनेमात तरी अमिताभने आपल्याला बाहुपाशात ओढावे यासाठी मौशमीने दिग्दर्शकाला तशी सिच्युएशन निर्माण करण्यास भाग पाडले; या गाण्यात तुम्ही पाहिले असेल तर नरिमन पॉईन्ट वरील कठड्यावरून चालणाऱ्या मौशमीला खाली उतरविण्यासाठी अमिताभ तिला बाहुपाशात घेतो.

पाऊस म्हटले की आठवते नमक हलाल मधील **'आज रपट जाएं तो हमें न उठाइयो'** हे गाणे; या गाण्यामध्ये अमिताभ व स्मिता पाटील यांची केमिस्ट्री छान जुळून आली होती पण या गाण्याच्या शूट नंतर स्मिता आपल्या आईकडे ढसाढसा रडली होती; स्मिता

सारख्या संवेदनशील अभिनेत्रीला व्यावसायिक चित्रपटामधील हे ओलेते अंग प्रदर्शन आवडले नव्हते.

मदनमोहन यांचा चित्रपट म्हणजे लता दीदींच्या सुरांची बरसात झालीच पाहिजे पण हसते जख्म चित्रपटामधील एक गाणे आहे; **'तुम जो मिल गये हो'**; या मध्ये लता दीदींच्या सुराला वावच नव्हता पण मदनमोहन यांनी गाण्यामध्ये एक जागा दीदींसाठी शोधूनच काढली ज्यात लाटांच्या आवाजाच्या पार्श्वभूमीवर लतादीदी एक सुरेख तान घेतात व त्यानंतरच काही क्षणांमध्ये गाण्यामध्ये पावसाची एंट्री होते; पावसासोबत पावसावर आधारित गाणी आपल्याला नॉस्टॅल्जीक करून सोडतात.

मला भरपावसात समुद्रावर जायला आवडते पण तेव्हा अंगावर पडणारे थेम्ब वाऱ्याच्या वेगामुळे पाठ मात्र चांगलीच शेकवून काढतात. इंग्लडमधील पाऊस आपल्या पुण्यातील पावसासारखा रिपरिप पडणारा पण

ते थेम्ब इतके गारठलेले असतात की अंगावर काटा फुलतो.

२६ जुलै चा प्रलयंकारी पाऊस व मी दुबईला होतो; माझी बायको ऑफिस मध्ये तीन दिवस अडकलेली; अशावेळी माझ्या १ वर्षाच्या मुलाला सांभाळले ते माझ्या आईने! मला सर्वात मोठा आश्चर्याचा धक्का देणारा पाऊस हा सौदी अरेबिया सारख्या वाळवंटातील होता; विजांचे तांडव व मुसळधार पाऊस जो तिथे मी अनुभवाला त्याला तोडच नव्हती; ह्युस्टन च्या पावसाची तऱ्हाच वेगळी; प्रचंड गडगडाट, चमकणाऱ्या वीजा पण पाऊस मात्र रिपरिप जसा काही बलदंड शरीराच्या पेहलवानाच्या चिरक्या आवाजासारखा.

पाऊस म्हटला की मला आठवतो लता दीदींचा सुर - **‘असा बेभान हा वारा, कुठे ही नाव मी नेऊ**

**नदीला पूर आलेला, कशी येऊ’**, यात पावसाचे अस्तित्व पूर दाखवून देतो; या गाण्यातील माझ्या सर्वात

आवडत्या ओळी म्हणजे 'कुळाचे, लौकीकाचे मी क्षणी हे तोडीले धागे; बुडाले गाव ते आता, बुडाले नाव ही मागे दिले हे दान दैवाने, करी माझ्या कशी ठेवू.'

रौद्र पावसाचे म्हणाल तर माझे सासरे २०१३ साली गेले; त्यादिवशी प्रचंड पाऊस; रस्ते, स्मशान सर्व काही पाण्याखाली गेलेले; अंत्यसंस्काराला गुरुजी पण यायला तयार झाले नाहीत मग स्मशानातील लाकडे रचणारा व माझ्या मामेभावाच्या मदतीने भडाग्नी दिला व दहाव्याला अस्थींना मंत्राग्नी दिला होता.

पण पाऊस म्हटले की असे एक दोन अपवाद सोडता खूपच चांगल्या, रोमँटिक आठवणी आषाढाच्या आभाळाप्रमाणे भरून येतात; मला माझ्या प्रेमासोबत शेअर करायला आवडेल अनुभव चित्रपटातील प्रसंग जिथे खिडकीतल्या पावसाच्या साक्षीने संजीव कुमारला तनुजा स्वरात मार्दव आणत विनंती करते,"**मुझे जाँ ना कहो मेरी जाँ मेरी जाँ**'; गुरुदत्तच्या आत्महत्येमुळे गीता

दत्त पार कोलमडली होती; तिने गाणे देखील सोडले होते; हे गाणे गीता दत्तचे कमबॅक गाणे होते.

सिनेमातील पाऊस म्हटले की डोळ्यांसमोर येतो आकाशातून बरसणारा; नव्हे कोसळणारा मुक्त बेधुंद पाऊस. पण यालाही एक अपवाद आहे. गाईड मधला देव आनंद आणि **’दिन ढल जाये हाये रात न जाय**” मधला पाऊस. फ़क्त खिडकीच्या काचांवरून हळुवार धारांनी सरकत, मूकपणे ओघळणारा; अगदी देव आनंदच्या डोळ्यांमधील अश्रूंसारखा व त्याच्या खालावत चाललेल्या नितीमत्तेसारखा.

पाऊस म्हटले की आल्याचा वाफाळलेला चहा व कांदाभजी आठवणारच व हे दोन्ही, बायकोच्या हातचे असेल तर पावसाळा कारणी लागला च समजा!

# गच्ची

लॉकडाऊन मुळे सध्या बाहेर जाणे शक्य नाही त्यामुळेच गच्चीवर गेलो होतो; हल्ली गच्चीवर जाणे हे तसे संक्रांतीच्या सुमारासच होते; पण गच्ची हा माझ्या जिव्हाळ्याचा विषय आहे; गच्चीवर गेल्यावर मला नकळतच रोमँटिक व्हायला होते किंवा कधी कधी आपण जगाच्या पसाऱ्यात किती क्षुल्लक आहोत याची जाणीव होते.

गच्ची म्हटले की मला काही रोमँटिक गाणी सहजच आठवतात; त्यामध्ये प्रामुख्याने दोन गाणी - एक 'घर' चित्रपटामधील **'आपकी आँखों में कुछ महके हुए से राज़ हैं आपसे भी खूबसूरत आपके अंदाज़ हैं'** व दुसरे गच्चीमध्ये मनसोक्त भिजणारे राजेश खन्ना व झीनत अमानचे '**भीगी-भीगी रातों में, मीठी-मीठी बातों में, ऐसी बरसातों में, कैसा लगता है**'. **मराठीमध्ये**

**आठवतात ती 'चंद्र आहे साक्षीला' व 'नवीन आज चंद्रमा, नवीन आज यामिनी' ही सुमधुर गाणी;** खरोखर प्रेयसी किंवा बायकोसोबत गच्चीवर चंद्राच्या साक्षीने प्रेमाच्या आणा भाका घेणे म्हणजे फारच हळवे क्षण असतात बुवा!

गच्चीवर गाण्यांची मैफिल जमविणे यासारखे सुरेख सुरेल संमेलनच नसते; लोड तक्के टाकून, अत्तराचे शिंपण पंख्यातून (पूर्वी जेवणाच्या पंक्तीमध्ये असायचे ना ते उभे फॅन) फवारून मामेबहिणीच्या लग्ना आधीच्या रात्री आम्ही भावंडांनी संगीत रजनी केली होती. चित्रपटांच्या बाबतीत म्हणायचे झाल्यास 'बाजार' चित्रपटामधील **'दिखाई दिये यूँ कि बेख़ुद किया; हमें आपसे भी जुदा कर चले'** हे गाणे म्हणजे चंद्राचे चांदणे जास्त शीतल का आपल्या लता दीदींचा आवाज असा प्रश्न मनात निर्माण करते; या गाण्यात देखील गच्चीवरच सुरमयी शाम सजलेली पाहायला मिळते.

गच्चीवर मुलांचा / बालगोपाळांचा हक्क जरा जास्तच असतो; गच्ची व बालगोपाल म्हटले की आठवते 'मिली' चित्रपटामधील **'मैने कहा फूलों से हँसो तो वो खिल खिला के हंस दिए'** हे जिंदादिल गाणे व पडद्यामागून हळूच डोकाविणारा अमिताभ. जयाचा अवखळपणा व मुलांचे नृत्य आज ही तितकेच प्रफुल्लित करते.

एकांत हवा असेल; अगदी सिगारेट शिलगावयाची असेल म्हणून किंवा स्वतःलाच ‘मी-टाईम’ द्यायचा असेल तर गच्ची सारखे ठिकाण नाही; अशा एकांतासमयी आठवतात ते गुलजार यांचे स्वर व गायक भूपेंद्रचे धीर गंभीर स्वर; गाणे तुम्ही ओळखले असेलच; **‘दिल ढूँढता है फिर वही फ़ुरसत के रात दिन’** व त्यातील पंक्ती; 'या गरमियों की रात जो पुरवाईयाँ चलें,ठंडी सफ़ेद चादरों पे जागें देर तक; तारों को देखते रहें छत पर पड़े हुए’

घर पाल्यात असल्याने लहानपणी गच्चीवर जाऊन आकाशात झेपावणारी विमाने पाहण्याचा छंद पण होता पण या विमानावरून आठवण येते ती 'मिली' चित्रपटाच्या आशादायक व त्याचवेळी हुरहूर लावणाऱ्या शेवटाची. कर्क रोगामुळे मरणार आहे हे माहित असून देखील जेव्हा जयाला अमिताभ ट्रीटमेंट साठी विदेशाला घेऊन जातो तेव्हा जिवाच्या आकांताने गच्चीवर धावणाऱ्या अशोक कुमारने एका सहृदयी बापाच्या संमिश्र भावना उत्कटतेने सादर केल्या आहेत. त्या विमानाकडे बघताना त्यांच्या एका डोळ्यात आपल्या काळजाचा तुकडा परत येईल ही आशा तर दुसऱ्या डोळ्यात आपण परत मुलीला जिवंत पाहू की नाही ही अनामिक भीती.

गच्ची म्हटली की आठवतो तो खूबसूरत चित्रपट; शिस्त प्रिय बायकोला, सासूला व आईला कंटाळलेल्या नवऱ्याने, सुनांनी व मुलांनी जमविलेली मैफिल एकदा

नाही तर दोनदा; पहिल्या प्रथम सासऱ्याच्या (अशोक कुमार) गाण्यावर व तबल्याच्या ठेक्यावर मनसोक्त नाचणारी सून (शशिकला) व होणारी भावी सून (रेखा) ; गाणे आहे; **'पिया बावरी'** तर दुसऱ्यांदा चक्क सासूच्या (दिना पाठक) विरुद्ध बंडाचा झेंडा फडकविण्यासाठी.

**गच्ची म्हटले की आठवते रंगपंचमीच्या दिवशी होणारी फुग्यांची मारामारी तर कधी गच्चीतील पापड, कुरडया, लोणच्याच्या फोडी यांची वाळवणं;** आणि संक्रांतीमधील कायपोचे ही घोषणा ऐकायची तर फक्त गच्चीवरच. कायपोचे म्हटले की साहजिकच डोळ्यासमोर उभा राहतो तो 'हम दिल दे चुके सनम मधील' ऐश्वर्या व सलमानचा धुसमुसळा पण तितकाच देखणा प्रणय! पण मला जास्त भावला तो आराधना चित्रपटामधील राजेश खन्ना व फरीदा जलाल चा प्रश्नोत्तरांचा रंगलेला खेळ ज्यात मोठ्या हुशारीने

राजेश फरीदाला होकार द्यायला भाग पाडतोच; गाणे अर्थात '**बाग़ों में बहार है?**'

**'ये तेरा घर ये मेरा घर'** या गाण्यामध्ये पती पत्नी मधील रंगलेला कॉमन माणसाचा प्रणय दीप्ती नवल व फारुख शेख ने फार उत्तम रित्या रंगविला आहे; हे गाणे सुद्धा गच्चीवरच चित्रित केले आहे.

गच्ची म्हटले की आठवतो माडाच्या झावळयांच्या आडून डोकाविणारा चंद्रमा किंवा आकाशातून अचानकच तुटणारा तारा! गच्चीवर जर जाई जुईचा मांडव असेल तर क्या कहने!; उन्हाळाच्या सुट्टीमध्ये आम्हा बाळगोपाळांना गच्चीवर झोपण्यात खूप मजा येत असे व मग उत्तररात्री भूत खेतांच्या गोष्टींना उधाण यायचे.

पूर्वीच्या काळी जेव्हा एकत्र कुटुंब पद्धती असायची, काका काकू सर्व एकत्र राहायचे; अशावेळी जर वडिलोपार्जित एक किंवा दुमजली घर असेल तर गच्चीवर हमखास एक छोटी झोपण्याची खोली

असायची; त्या खोलीवर नुकतेच लग्न झालेल्या नवदांपत्याचा एकाधिकार असायचा; ती खोली मग त्या राजा राणीला स्वर्गाहून प्रिय भासायची व त्या खोलीला रंगमहालचा दर्जा मिळायचा; हीच खोली कालांतराने मग १० वि किंवा १२ विच्या परीक्षेला बसलेल्या मुलांसाठी स्टडी रूम म्हणून देखील दिली जायची.

गच्ची वर बालपण, प्रणय सोहळा व कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्याचे भाग्य लाभलेली आमची पिढी म्हणूनच गच्चीशी समरसून गेली नाही तरच नवल!

# समुद्र

मला समुद्र खूपच आवडतो; पोहता येत नसल्याने पाण्याची भीती वाटत असली तरी समुद्र किनारी मी तासंतास एकटा बसू शकतो; समुद्राचे आकर्षण बहुदा माझ्या आजोळामुळे म्हणजे उंबरगावमुळे असावे; आमचे घर व खाडीमध्ये फक्त ४- ५ घरांचे अंतर आहे; माडीवर बसा किंवा ओसरीवर बसा तिथून समुद्राचे मस्त दर्शन घडायचे (आता मात्र शेजाऱ्यांनी घर एकमजली केल्याने हे सुख हिरावले गेले आहे.)

समुद्राची गाज मला खूप आवडते, लहानपणी मला देखील शंख शिंपले गोळा करायला आवडायचे; हेतू हा की त्यापासून काहीतरी कलाकृती घडवावी पण आजतागायत ते काही घडले नाही.

समुद्र म्हटला की तमाम प्रेयसी व बायकांचे आवडते गाणे आठवते; '**जिथे सागरा धरणी तिथे तुझी मी वाट पाहते**' पुत्र व्हावा ऐसा या चित्रपटामधील हे गाणे सुमन कल्याणपूर यांच्या आवाजात आहे; हा चित्रपट प्रदर्शित होताच लगेच पडला पण या गाण्याच्या तुफान लोकप्रियतेमुळे निर्मात्याला इतकी रॉयल्टी मिळाली की तो मालामाल झाला.

सागर म्हटला की आठवतात स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांचे विरह गीत; **'ने मजसी ने परत मातृभूमीला'**; मी जेव्हा समुद्रावर एकटाच बसलेला असतो तेव्हा या गाण्याचे सूर समुद्राच्या लाटांसारखे सतत माझ्या मनाच्या भिंतींवर दस्तक देतात.

समुद्र म्हटला की मला आठवणारी रोमँटिक गाणी अनेक आहेत पण मला अत्यंत प्रिय असणारे खामोशी चित्रपटामधील **'वो शाम कुछ अजीब थी ये शाम भी अजीब है वो कल भी पास पास थी वो आज भी**

**करीब है'**; या गाण्यासारखी डेट करायला मला खूप आवडेल. या गाण्याच्या शूटिंगच्या वेळी खरे तर राजेश खन्ना गाण्याचे बोल विसरला होता तेव्हा वहिदा त्याच्या कानामध्ये प्रोम्टिंग करत होती व म्हणून या गाण्याच्या दरम्यान काही काळ कॅमेरा तिच्या पाठीवर फोकस केला होता.

मला आवडणारे दुसरे गाणे घरोंदा चित्रपटामधील आहे; **'तुम्हे हो ना हो मुझको तो इतना यकीं है मुझे प्यार तुमसे नहीं है'** प्रेयसी किंवा बायकोसोबत हातामध्ये हात घालून लाटा तुडवत जाणे व जमल्यास एकच भेळपुरी किंवा गोळा शेअर करण्यासारखे महासुख नसते; मी तर बाबा अनुभवले आहे.

हावडा ब्रिज बघताना मला राजेश खन्ना व शर्मिला च्या 'अमरप्रेम'मधील ती होडी हमखास आठवते व याच दोघांवर चित्रित झालेले सफर चित्रपटामधील

समुद्रकिनाऱ्यावरील गाणे; '**नदिया चले चले रे धारा**' हे देखील माझे अत्यंत आवडते गाणे आहे.

समुद्र म्हटला की **'सागर किनारे दिल ये पुकारे'** किंवा **'समंदरमे नहाके और भी नमकीन हो गई हो'** या सारखी गाणी देखील कॉलेजकुमारांच्या ओठावर नक्कीच येत असतील आणि हो समुद्र म्हटले की एक दुजे के लिये मधील वासू-सपना नाही आठवले तर तो मुलगा किंवा मुलगी प्रेम करण्याच्या लायकीचेच नाही असे खुश्शाल समजावे!

समुद्र म्हटले की आठवते माझ्या मॅनेजमेंट कॉलेज च्या मित्र मैत्रिणींसोबत केलेली अलिबाग टूर; चांदण्यारात्री मध्यरात्री सागराच्या साक्षीने केलेल्या गप्पा; फेसाळलेल्या शुभ्र लाटा; दूर वर दिसणारा किल्ला सगळेच स्वप्नवत!; भरतीप्रमाणे आमच्या गप्पांना आलेले उधाण तेव्हाच थांबले जेव्हा आम्ही बसलेल्या

पायऱ्यापर्यंत पाणी आले; रात्रीचे अडीच वाजले होते तेव्हा.

उंबरगावच्या किनाऱ्यावर झोकात साजरे होणारे गणेश विसर्जन देखील मनाच्या भिंतीवर कायमचे कोरले गेले आहे; आळीतील सर्व मुर्त्या एका झोपाळ्यावर विराजमान होत असत मग दोन छोट्या होड्यांना समांतर ठेवले जाई व त्यावर मूर्ती असलेला झोपाळा आडवा ठेवला जात असे. मग त्या दोन्ही होड्यांना विरुद्ध दिशेने व्हलवले जायचे ज्यामुळे तो झोपाळा मूर्तींसकट अलगद पाण्यामध्ये हिंदोळे खात खाली जायचा; विसर्जन बाप्पाचे असते पण डोळे माझे पाणावतात; अगदी दरवर्षी!

डहाणू व धाकली डहाणू असे दोन भाग आहेत; तसेच उंबरगाव च्या समोर नारगोळ बेट आहे त्यामुळे होडीने दोन्ही ठिकाणचा प्रवास करताना मजा यायची पण आता दोन्ही ठिकाणी समुद्रावर ब्रिज झाल्याने ती मजा

पण भूतकाळ झाला. मालवणचा सिंधुदुर्ग व मुरुडचा जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पण समुद्रावर होडीच्या रूपात स्वारी केली आहे; साऊथ हॅम्पटन किनारा जिथून टायटॅनिक चा प्रवास सुरु झाला त्याठिकाणी पण जायचा योग आला; ब्लॅकपूल समुद्रकिनाऱ्याच्या पॅनोरॅमिक व्ह्यू ४०० फुटाच्या टॉवरवरून घेण्याचा अनुभव देखील थरारक होता.

माझा मावसभाऊ वैमानिक आहे त्याच्या प्रशिक्षणादरम्यान त्याने मला चौथीची स्कॉलरशिप मिळाल्याचे बक्षीस म्हणून जुहू एयरपोर्ट वरून प्रशिक्षणार्थी विमानातून गोराई पर्यंत समुद्रावरून फेरफटका मारून आणले होते तेव्हा मनात आनंदापेक्षा अनामिक भीतीच दाटून आली होती; चला तर मग समुद्राच्या साक्षीने आपण अनुभवलेल्या आठवणी देखील शेअर करा.

## मैत्री

आयुष्यात प्रत्येकाच्या वाट्याला मैत्री ही येतेच; कधी ती संधीसाधू असते तर कधीतरी निरपेक्ष; मैत्री म्हणजे वाळवंटामधील मृगजळ नसते तर खरोखरचा शीतल, मधुर, शाश्वत झरा असतो; मैत्री ही कधी कधी प्रेमात रूपांतरित होते व आपल्याला आयुष्यचा जोडीदार देऊन जाते; तर कधी मैत्री ही रक्ताच्या नात्यापेक्षा घट्ट होते व आपल्याला मन मोकळे करून मुक्तपणे रडण्यासाठी आश्वासक खांदा देऊन जाते; मैत्री ही छंद /स्वभाव जुळल्यामुळे जशी होते तशी दोन ध्रुवांसारखे विभिन्न स्वभाव असलेल्यांमध्ये देखील होते.

मैत्री म्हटले की आठवणारी सदाबहार गाणी म्हणजे - नमक हराम मधील, **'दीये जलते हैं, फूल खिलते हैं बड़ी मुश्क़िल से मगर दुनिया में दोस्त मिलते हैं'** व शोले मधील **'ये दोस्ती हम नहीं तोड़ेंगे; तोड़ेंगे दम**

मगर तेरा साथ ना छोडेंगे'. खरोखरच मित्र हे कमवावे लागतात; ते विकत घेता येत नाहीत व जिवाभावाचे मित्र मृत्यूला देखील हरवितात; कर्ण व दुर्योधन हे त्याचे उत्तम उदाहरण पण जेव्हा मित्र आयुष्याला कलाटणी देणारा दुवा ठरतो तेव्हा ते कृष्णार्जुन ठरतात.

मला देखील आयुष्यात खूप मित्र मिळाले; एकुलता एक असल्याने मला भावंडांचे प्रेम मिळाले नाही; त्यामुळे माझ्यासाठी मैत्रीचे महत्त्व अजूनच वाढले होते; पण शालेय जीवनात मला फारसे मित्र नव्हते पण तो बॅकलॉग नंतरच्या आयुष्यात भरला गेला. माझा एक मित्र होता; तो प्रेमात पडला होता पण घरून पाठिंबा मिळणार नाही असते त्याला वाटत होते; त्यामुळे मित्राने व त्याच्या मैत्रिणीने गुपचूप कोर्ट मॅरेज करण्याचे ठरविले; त्यासाठी एक साक्षीदार म्हणून माझी भूमिका ठरली. तो कोर्ट मॅरेजचा दिवस उजाडला तरी मित्राचा पत्ता नाही; मग थोड्या तासांनंतर तो प्रफुल्लित चेहऱ्याने आला; झाले

असे की मित्राच्या धाकट्या भावाने घरी जाहीर केले की त्याने त्याचा आयुष्याचा जोडीदार शोधला आहे; हे ऐकून माझ्या मित्राला देखील स्फुरण चढले व त्यानेही वडिलांना आपल्या प्रेमाची कबुली दिली. अशाप्रकारे आमचा गुप्त कट शिजण्याआधीच करपला.

माझे बहुतेक मित्र व मैत्रिणी देखील सोशल ड्रिंकर्स आहेत; आम्हीच आपले लस्सीमध्ये थम्प्स अप टाकून पिणारे; एकदा आमच्या सर्वांची ओली पार्टी होती; एक मित्र जरा प्रमाणाबाहेर प्यायला; दुसऱ्यादिवशी घरच्यांसमोर जायची लाज वाटू लागली; तेव्हा मित्राच्या आईला असे सांगण्यात आले की तो दुसऱ्या दिवशी प्रशांतकडे व्यवस्थापनाच्या प्रेझेंटेशनच्या तयारीसाठी थांबणार आहे; मित्राची आई एकदम निश्चिन्त झाली; मी असा लाईफ सेव्हर असायचो; मजा बघा माझा पहिला जॉब, पहिले बक्षीस (कॉर्पोरेट क्विझ जिंकल्याबद्दल)

होते ते मोगल मोनार्क ची बाटली; मग काय माझ्या मित्रांच्या आनंदाला पंखच फुटले.

अनंत चतुर्दशीला गिरगाव येथील गणपती विसर्जन मिरवणूक ज्यामुळे राजीव व देवकीशी मैत्री जुळली यावर्षी आमच्या मैत्रीचा रौप्य महोत्सव साजरा होईल; सुभाष साठे व विजया वहिनी; सुरुवात मित्र म्हणून झाले व आता ते दोघे माझे दादा वहिनीच झाले आहेत.

बरेच दा आपले सो कॉल्ड क्राईम पार्टनर हे मित्रच असतात मग तो पहिला सिगारेटचा झुरका असो की एखादा केलेला राडा असो; राडा म्हटले की आठवते ते तेजाब चित्रपटामधील **'सो गया ये जहाँ सो गया आसमाँ'** हे गाणे आणि जर आपले हे (फिझिकल अंतरामुळे दूर झालेले) क्राईम पार्टनर जर खूप दिवसांनी भेटले तर ओठांवर सहजच येते ते गाणे; **'बम्बईसे आया मेरा दोस्त; दोस्त को सलाम करो.'**

आनंद चित्रपटामधील आनंद व बाबूमोशाय सारखी मैत्री लाभणे यासारखे भाग्य नाही; अभिमान चित्रपटामध्ये अमिताभ चे लग्न जयाशी झाल्यानंतर देखील बिंदू निखळ मैत्री जपते व प्रसंगी दुरावलेल्या जोडप्याला अजून दूर न करता परत जवळ आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करते; मैत्रीचा हा कंगोरा जितका मोहक होता (कारण बिंदूचे अमिताभ वर एकतर्फी प्रेम असून देखील तिने परिस्थितीचा गैरफायदा उचलला नाही.) तेव्हढाच खूबसूरत चित्रपटामधील अशोक कुमार व रेखाच्या मैत्रीचा (भावी सासरा व सून); असेच काहीसे बॉण्डिंग पाहायला मिळते ते अर्थ चित्रपटामध्ये; जिथे घटस्फोटाच्या जीवघेण्या नैराश्यामधून नायिकेला वाचवायला मित्रच पुढे येतो व **'तुम इतना जो मुस्कुरा रहे हो; क्या गम है जिसको छुपा रहे हो?'** असे म्हणत नायिकेचा वाढदिवस साजरा करून तिच्या ओठावर हास्य फुलवितो.

मित्राच्या किंवा मैत्रिणीच्या लग्नामध्ये आपल्या अंगात एक वेगळाच जोश संचारलेला असतो कारण मित्राच्या किंवा मैत्रिणीच्या लग्नाच्या निमित्ताने आपल्या अंगाला देखील हळद लागेल तर बरं असा मानस असतो; **'आज मेरे यार की शादी है'** हे गाणे मग हमखास गुणगुणले जाते.

आज माझ्या असंख्य मैत्रिणी आहेत ज्या माझ्यापेक्षा आज माझ्या बायकोच्या मैत्रिणी जास्त आहेत; अगदी मुंबईमध्ये उतरल्यावर हक्काने माझ्या घरी उतरणाऱ्या/ एक दोन दिवस मुक्काम करणाऱ्या! अनिशसारखे मित्र जे वाढदिवसाला छान केरिकेचर करून भेट देतात; दत्ता सारखे मित्र जे त्याच्या गोव्याला पाहुणचारासाठी सहकुटुंब आमंत्रित करतात; प्रगती सारखी मैत्रीण जीने आईच्या निधनाप्रसंगी माझ्या कुटुंबाची काळजी घेतली; या सर्वांचा मी ऋणी आहे;माझा मित्र मंदार आमची मैत्री आता तिसऱ्या पिढीमध्ये पोहचली आहे; त्याची व माझी

आई व त्याचा व माझा मुलगा असे सर्वजण मैत्रीच्या धाग्यांमध्ये गुंफले गेलो.

मुलगा व मुलगी यांच्यामधील मैत्री एक अजब रसायन असते, नवऱ्याची मैत्रीण स्वीकारली जाते; बायकोचा मित्र स्वीकारणे अजून जड जाते; पण हे चित्र देखील लवकरच बदलेल.

## पियानो

वाद्य हे नॉस्टेल्जीयाचे कारण अशासाठी असू शकते की अनेकांच्या जीवनसाथी निवडीच्या टप्प्यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावलेली असते; पूर्वीच्या काळी मुली पाहण्याच्या कार्यक्रमामध्ये हटकून मुलीला सतार किंवा तंबोऱ्यावर गाणे पेश करण्याची फर्माईश केली जात असे किंवा कॉलेजच्या स्नेहसंमेलनामध्ये गिटारवर ताल धरून मुलींना इम्प्रेस करण्याचा घाट घातला जात असे; सहलीमध्ये माऊथ ऑर्गन वाजवून अनेक प्रेमवीरांनी आपले इप्सित साध्य केले असेलच.

माझे वडील बुलबुलतरंग नावाचे वाद्य फार सुंदर वाजवायचे; त्यांचे या वाद्यावर इतके नितांत प्रेम होते की त्यांची मृत्यूपूर्व अंतिम इच्छा मी त्यांच्या बुलबुलतरंगाची तुटलेली तार दुरुस्त करून आणावी; जी अर्थातच वडिलांच्या मृत्यूमुळे अपूर्णच राहिली.

मला आयुष्यात दोन वाद्ये अजून ही शिकावीशी वाटतात; एक अस्सल भारतीय वाद्य, सतार तर दुसरे पाश्चात्य धाटणीचे पियानो; पियानो म्हणजे राजेशाही वाद्य त्याला ठेवायला देखील मोठी जागा हवी; पियानोला हिंदी चित्रपट सृष्टीमध्ये मानाचे स्थान दिले ते संगीतकार नौशाद यांनी; आणि माझे अहो भाग्य म्हणजे ज्या पेटीवर व पियानोवर त्यांनी चाली लावल्या त्या दोन्ही वाद्यांना मला पाहता आले.

प्रत्येक वाद्याला एक संस्कृती असते; पियानो म्हटले की सुटाबुटामधील पुरुषच डोळ्यासमोर येतो किंवा सतार म्हटले की सुंदर भारतीय साडी परिधान केलेली स्त्री!

हिंदी संगीतामध्ये पियानो व प्रेमातील त्रिकोण हे एक समीकरणच बनले आहे; त्यामुळेच आठवतात काही अवीट गोडीची गाणी जशी की ‘लव्ह इन टोकियो’

मधील, **'मुझे तुम मिल गये हमदम'** किंवा मग 'संगम' मधील **'दोस्त दोस्त न रहा'**

पियानो म्हटले की मला अनेक गाणी डोळ्यासमोर येतात पण त्या गाण्यातील सिच्युएशन माझ्या जीवनात यावी असे मात्र वाटले नाही; अर्थातच एखाद दुसरा अपवाद वगळता!; मला खूप भावुक करणारे पियानो वरील गाणे म्हणजे गुमराह मधील, '**चलो एक बार फिर से अजनबी बन जाएँ हम दोनों**'; हे गाणे खऱ्या अनुभवावर आधारित आहे. गीतकार साहिर लुधियानवी व गायिका सुधा मल्होत्राचे एकमेकांवर प्रेम होते पण प्रेमाआड धर्म आल्याने सुधाचे लग्न दुसऱ्या व्यक्तीशी लावून देण्यात आले; एकदा बी आर चोप्रांच्या पार्टीमध्ये साहिरच्या समोरच सुधाचे आपल्या पतीसमवेत आगमन झाले; साहिर अर्थातच व्यथित होऊन पार्टी सोडून जाऊ लागले पण चोप्रांनी त्यांना या अनुभवावर गीत लिहून

नैराश्याला सकारात्मक मार्ग दाखविण्याचे चॅलेंज दिले; अशाप्रकारे हे गीत जन्मास आले.

पियानोवर असेच प्रेयसीला गमाविण्याचे दुःख मांडले गेले ते ब्रह्मचारी चित्रपटामध्ये; गाणे अर्थातच ' **दिल के झरोखे में तुझको बिठाकर यादो को तेरी मैं दुल्हन बनकर रखूँगा मैं दिल के** पास.' जेलर चित्रपटामधील लता व मदन मोहन यांचे एक अजरामर कॉम्बिनेशन म्हणजे **'हम प्यार में जलने वालों को चैन कहाँ; हाय, आराम कहाँ'** हे गाणे पण पियानोवरच चित्रित आहे; आता सांगा पाहू अशा सिच्युएशन कोणाच्या जीवनात याव्यात का? नाही ना!

नाही म्हणायला मला पियानोवरील दोन प्रसंग रियल लाईफ मध्ये अनुभवायला निश्चितच आवडले असते व त्यातील एक म्हणजे 'अपराध' या चित्रपटामधील **'सूर तेच छेडीता'** यात रमेश देव काय राजबिंडे दिसले आहेत! सीमा देव यांची मुलाखत घेताना या गाण्याचा

आवर्जून उल्लेख या लव्ह बर्ड्स ने केला होता; व दुसरे गाणे माझ्या आवडत्या काका वर म्हणजे राजेश खन्नावर चित्रित झालेले **'प्यार दिवाना होता है.'**

कामानिमित्त अनेकदा पंचतारांकित हॉटेल्स मध्ये जाणे झाले; काही ठिकाणी रिसेप्शन मध्ये एक पियानोवादक बसलेला असतो व तो अतिथींच्या फर्माईशप्रमाणे पियानोवर गाणी वाजवत असतो; अशा कलाकारांबद्दल मला खूप ममत्व वाटते.

एकदा खूप मजा झाली; मला मनापासून वाटायचे की मी एखादी फर्माईश त्या वादकाला करावी व आश्चर्य म्हणजे मनकवड्या माणसासारखे नेमके तेच गाणे तो वाजवायचा; असे एकदा नाही तर लागोपाठ तीनदा झाले होते; कफपरेड येथील प्रेसिडंट हॉटेलचा हा किस्सा १९९३ साल चा आहे बहुतेक. कामानिमित्त साऊथहॅम्पटन ला असताना पंचतारांकीत हॉटेल मध्ये एक पियानो होता त्यावर अनेकदा टायटॅनिक चे सिग्नेचर

ट्यून वाजविले जाई; कधी कधी ग्राहकांना देखील पियानोवर हात साफ करण्याची संधी देण्यात येत असे.

मला जर पियानो वाजविता आला असता तर बायको किंवा प्रेयसी साठी मला हे गाणे वाजवावेसे वाटेल - **'आप के हसीन रुख़ पे आज नया नूर है, मेरा दिल मचल गया तो मेरा क्या क़ुसूर है'** तर माझ्या प्रेमाने माझ्यासाठी **'धीरे धीरे मचल ऐ दिल-ए-बेकरार, कोई आता है; यूँ तड़प के ना तड़पा मुझे बार बार'** हे गाणे वाजवावे

पियानोशी आठवणी निगडित असणे जरा हटके असू शकते; हरकत नाही तुम्हाला आवडणारी पियानोवरील गाणी तरी शेअर करा - शक्य असल्यास का आवडते या कारणासहीत!

आता बोलूया माझ्या दुसऱ्या वाद्याबद्दल; सतार म्हटले की आठवतात मदन मोहन यांची काही अप्रतिम गाणी; **'रस्मे उल्फत को निभायें'** या गाण्यातील

पोस्टल्यूड मधील सतार अक्षरशः अंगावर काटा उभा करते; मेरा साया मधील **'नैनो में बदरा छाये, बिजली सी चमके हाय'** या गाण्यातील सतार उदयपूरच्या निसर्ग सौंदर्याला अजूनच खुलवते.

खरे तर प्रत्येकाने एखादे वाद्य शिकलेच पाहिजे कारण म्युझिक थियरपी अनेक व्याधींना दूर ठेवते हे एव्हाना सिद्ध झाले आहे; बऱ्याच कॉर्पोरेट ऑफिसमध्ये लोकांची उत्पादकता वाढविण्यासाठी इंस्ट्रुमेंटल म्युझिक मंद आवाजात लावलेले असते; चला तर मग एखादे सुंदर वाद्य डोळ्यासमोर आणू व आपला मूड आनंदी बनवू!

## पत्र

आजकाल पत्रलेखन ही कला दुर्मिळच होत चालली आहे; पण माझ्या बालपणात व तरुणपणात मी अनेक पत्रे लिहिली; पत्रे म्हटले की डोक्यात सर्वप्रथम येते ते प्रेमपत्र पण मी मात्र अनेकांना पत्रे लिहिली मित्रांना, आई वडिलांना, शिक्षकांना नातेवाईकांना; आणि हो प्रेमपत्र देखील.

प्रेमपत्र म्हटले की चित्रपटामधील अनेक गाणी ओठावर येतात; कन्यादान चित्रपटामधील **'लिखे जो खत तुझे वो तेरी याद में हज़ारों रंग के नज़ारे बन गए'** हे त्यापैकी एक; दुसरे म्हणजे संगम चित्रपटामधील **'ये मेरा प्रेमपत्र पढ़ कर के कि तुम नाराज ना होना कि तुम मेरी ज़िंदगी हो कि तुम मेरी बंदगी हो;** सरस्वतीचंद्र मधील गाणे**;'फूल तुम्हें भेजा है खत में'** देखील ओठावर येतेच की!

पूर्वी जेव्हा टपाल यंत्रणा नव्हती तेव्हा कबुतर हे संदेशवाहक असायचे त्यामुळे प्रेमवीरांना त्याचाच एक आसरा होता; लता दीदींच्या आवाजातील **'कबुतर जा जा जा, पहले प्यार की पहली चिठ्ठी'** हे गाणे आज देखील लोकप्रिय आहे.

आज ही भारतामध्ये स्त्रियांमध्ये निरक्षरता असल्याने पत्र पोस्टमन कडून लिहून घेतले जाते म्हणूनच की काय **‘खत लिख दे सांवरिया के नाम बाबू’** या गाण्याचा जन्म झाला असावा. प्रेम असफल झाले की एकमेकांना लिहिलेली प्रेमपत्रे अनाथ पोरकी होऊन जातात पण अशावेळी सिद्धहस्त गीतकार गुलजार लिहून जातात," **मेरा कुछ सामान तुम्हारे पास पड़ा हैं, सावन के कुछ भीगे भीगे दिन रखे हैं; और मेरे एक ख़त में लिपटी रात पडी हैं, वो रात बुझा दो, मेरा वो सामान लौटा दो.**

मराठीमध्ये पत्रावरून आठविणारे हटके गाणे म्हणजे **'सप्रेम नमस्कार विनंती विशेष'** या गाण्याचे गायक होते पंडित वसंतराव देशपांडे

मला आठवते मित्राच्या मित्रासाठी मी प्रेमपत्र लिहिले होते; पण ते पत्र प्रेमपत्र स्पर्धेसाठी होते; पुढे खूप वर्षांनी मला कळले की त्या पत्राच्या जोरावरच मित्राच्या मित्राने त्याच्या आयुष्यातील खरीखुरी प्रेयसी पटकाविली होती; मला ते पत्र थोडे धूसरसे आठवत आहे ज्यात मी असे काहीसे लिहिले होते - 'हे पत्र जरी साध्या कागदावर लिहिले असेल; यात जरी चाफ्याची फुले नसली तरी माझे शब्द वाचल्यावर तुला हे पत्र गुलाबी व सुवासिक नक्कीच वाटू लागेल'; त्यात एका चित्रपटगीताच्या ओळी पण लिहिल्या होत्या; ‘रोज हमें मिलके भी, मिलने की आस रहें ; रोज मिटे प्यास कोई और कोई प्यास रहें’ त्या पत्रामुळे अनेक इतर प्रेमवीरांची पत्र मी लिहावीत असे मित्राने मला सुचविले होते ज्याला

मी अर्थातच नकार दिला होता कारण माझे स्पष्ट मत आहे की प्रेमाची लढाई प्रत्येकाने स्वबळावर जिंकावी.

असो माझ्या आयुष्यातील जी अविस्मरणीय पत्रे आहेत त्याचे विषय एकदम हटके होते; माझी मावशी पंढरपूरच्या वारीला गेली होती; त्या वारीचे अनुभव तिने मला कळविले होते; तेव्हापासून मला वारीबद्दल सविस्तर कळले होते; दुसरे पत्र होते मी जेव्हा पहिल्या जॉब निमित्त कलकत्त्याला होतो तेव्हा माझ्या शालेय मित्राने, सचिन ने पाठविलेले पत्र; कलकत्ता जॉब अचानक ठरल्याने मित्रांपैकी कोणालाच काही माहित नव्हते त्यामुळे सचिन ने ते पत्र जरा घुश्यातच पाठविले होते व भाषा पेशवेकालीन मराठी होती व पत्राखाली सही मोडी लिपीमध्ये होती.

एका मी विशाखापट्टणम वरून सिकंदराबाद ला येत होतो तेव्हा अचानक बंद पुकारल्याने आमची ट्रेन सिकंदराबादपासून १० किलोमीटर आधीच माळरानी

थांबली होती; त्या रेल्वे ट्रॅक ला १ किमी अंतरावर समांतर रस्ता होता; सगळे प्रवासी ट्रेनमधून उतरले व रस्त्याच्या दिशेने चालू लागले; माझ्या समोर एक सत्तरीमधील आजोबा होते; मी ते एकटे पडू नयेत म्हणून त्यांच्यासोबत ट्रेनमध्येच थांबलो. उतरणाऱ्या प्रवाशांना मी रस्त्यावर पोहचल्यावर आजोबांच्या मुलाला फोन करायला सांगितले (१९९६ साली मोबाईल नव्हते); त्यांचा मुलगा श्रीमंत होता; तो आलिशान गाडी घेऊन आला व आम्ही तिघे सिकंदराबादला पोहचलो; आजोबांनी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मला मुंबईला मग एक भावुक करणारे पत्र पाठविले होते.

सैनिकांनी आपल्या घरच्या लोकांना लिहिलेली पत्रे किंवा त्यांना आलेली पत्रे हा खूप हळवा विषय असतो; बॉर्डर चित्रपटामधील, **'संदेशे आते हैं, हमें तड़पाते हैं;तो चिट्ठी आती है;वो पूछे जाती है;के घर कब आओगे'** हे गाणे डोळ्यात अश्रू आणायला पुरेसे आहेत;

**'चिठ्ठी आई है'** हे गाणे देखील अनेकांना भावुक करून जाते.

देवानंद यांनी सुरुवातीच्या काळात सैन्यदलाच्या डिपार्टमेंट मध्ये काम केले होते; हे डिपार्टमेंट सैनिकांना येणाऱ्या किंवा त्यांनी लिहिलेल्या पत्रांचे वाचन करायचे; पत्रातून हेरगिरी होत नाही हे पटल्यावरच पत्राचा पुढचा प्रवास सुरु व्हायचा; लोकांची वैयक्तिक माहिती वाचावी लागते हे देव यांना व्यथित करायचे पण या कामामुळेच त्यांना विरह व प्रेमाचे जीवनातील महत्त्व जाणविले.

काही पुस्तकवेड्या वाचकांना आपल्या आवडत्या लेखकांना पत्रे पाठवण्याचा षौक असतो; उद्देश दोन पुस्तक आवडल्याचा अभिप्राय कळविणे व आपल्या आवडत्या लेखकाचे स्वाक्षरीसहित पत्र मिळविणे; माझ्या अनेक मित्रांकडे पु ल, व पु यांच्या स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या पत्रांचा खजिना आहे.

मी नाशिक ला जॉब निमित्त असताना आई बाबांना पत्र लिहून माझी खुशाली दर आठवड्याला कळवायचो; आमच्या बालपणी पेन फ्रेंड असा देखील एक प्रकार असायचा; विदेशातील मित्रांना लिहिण्याचे दोन फायदे होते; मैत्री वृद्धिंगत करणे व विदेशातील स्टॅम्प व नाणी जमा करणे.

पत्रलेखन हा मराठी च्या पेपरमधील हमखास गुण देणारा प्रश्न असायचा; पूर्वी जेव्हा स्मार्ट फोनचे प्रस्थ नसायचे तेव्हा वाढदिवसाला शुभेच्छा कार्ड सोबत मित्रांची दोन तीन ओळींची चिठ्ठी देखील सोबत असायची त्या ओळी तेव्हा सर्व विश्व व्यापून टाकायच्या; म्हणूनच आपण सर्वांनी पत्रलेखनाची लुप्त होणारी शैली जपणे नितांत जरुरी आहे.

# ट्रेन

ट्रेन म्हणजे आमच्या पिढीतील लोकांचा एक हळवा विषय; साहजिकच आहे तेव्हा हवाई क्षेत्रामध्ये क्रांती झाली नव्हती व बरेचसे लोक हे निम्न मध्यमवर्गातील होते; लहानपणी झुकझुकगाडी म्हणून ही ट्रेन अधिकतर मुलांच्या बालविश्वामध्ये प्रवेश करायची व त्यावेळचे एकमेव गाणे असायचे ते म्हणजे; **'झुक झुक, झुक झुक अगीनगाडी धुरांच्या रेषा'**; गाण्यामध्ये तरी ही गाडी मामाच्या गावाला जायची पण त्याकाळी मामाच्या गावी म्हणजे कोकणामध्ये जायला ट्रेन नसायची; तर असायची एस टी.

१५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारी अशा दिवशी चित्रहार मध्ये 'आओ **बच्चो तुम्हे दिखाये झाँकी हिंदुस्तान की**' हे गाणे लागायचे ज्यात ट्रेनच्या प्रवासाद्वारे भारताची महती दाखवली जायची.

पण ट्रेन खऱ्या अर्थाने रोमँटिक केली ती देव आनंद व राजेश खन्ना यांनी; **'है अपना दिल तो आवारा'** या गाण्यात देव ने वहिदाला खूप सतावले आहे; या गाण्यातील माऊथ ऑर्गन वाजविला होता तो आपल्या सर्वांच्या लाडक्या पंचम ने; देव म्हटले की आठवते **'जिया ओ जिया कुछ बोल दो'** हे गाणे देखील. या गाण्यात होते आशा पारेख व देव; अगदी सेम तशीच सिच्युएशन आराधना चित्रपटामध्ये राजेश खन्ना व शर्मिला वर चित्रित झाली होती; गाणे अर्थातच **'मेरे सपनोंकी रानी कब आयेगी तू'** या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे शर्मिला ट्रेन मध्ये बसली नव्हती, तिच्यावरील शॉट हे स्टुडियोमध्ये चित्रित झाले होते.

माझ्या बाबतीत म्हणायचे झाल्यास लहानपणी डेक्कन क्वीन मधून केलेला मुंबई पुणे प्रवास, कर्जतचे दिवाडकर यांचे बटाटेवडे, खंडाळा घाट व बोगदे हा अनुभव नॉस्टॅल्जिक आहे; **'हिरव्या हिरव्या रंगाची**

**झाडी घनदाट सांग गो चेडवा दिसता कसो खंडाळ्याचो घाट**' हे गाणे देखील या प्रवासावरच आधारित आहे.

ट्रेन म्हटले की आठवते राजेश खन्ना व झीनत अमान चे '**हम दोनो दो प्रेमी**' हे भलतेच रोमँटिक चालत्या ट्रेनमध्ये चित्रित केलेले गाणे; या गाण्याच्या शूटिंगच्या दरम्यान मुंबईमध्ये तंत्रज्ञांचा संप झाल्यामुळे पंचम याने ट्रेनचे आवाज वापरून इंटरल्यूड म्युझिकचा प्रॉब्लेम सोडविला होता; मदाल हे वाद्य व सॅण्डपेपर या दोन गोष्टी वापरून पंचम यांनी ट्रेनच्या आवाजाचा इफेक्ट साधला; असेच दुसरे एक रोमँटिक गाणे ऋषीकपूर व पद्मिनी कोल्हापुरे यांच्यावर चित्रित झाले आहे; गाण्याचे बोल आहेत, '**होगा तुमसे प्यारा कौन.**'

आम्ही जॉन्सन एन्ड जॉन्सनचे ऑफिस सहकारी वार्षिक कॉन्फरन्स साठी उटीला गेलो होतो व नंतर पुढील वर्षी मसुरीला (दिल्ली राजधानी); तेव्हा ट्रेनमध्ये फुल

धुडगूस घातला होता कारण पूर्ण एसी बोगी आमचीच होती अशावेळी दोन गाणी खूप प्रकर्षाने आठवली व ती म्हणजे बर्निंग ट्रेन चित्रपटामधील कव्वाली व पेंटल व ऋषीकपूरचे स्त्री वेशातील रफ़ूचक्कर मधील धमाल गाणे; '**झुक झुक बोंबे से बरोडा तक**'

अमोल पालेकर ने पडद्यावर नेहमीच कॉमन मॅन साकारला त्यामुळे त्याच्या चित्रपटामध्ये मुंबईची लोकल ट्रेन दिसली नसती तरच नवल!; त्याच्यावर व टीना मुनीम वर चित्रित झालेले **'सुनीये, कहिये; कहते सुनते बातों बातों में प्यार हो जायेगा'** हे गाणे देखील खूपच सुंदर चित्रित झालेले आहे.

लोकल ट्रेन म्हणजे समस्त महिला वर्गाचे दुसरे माहेरच; गाडीमध्येच हळदीकुंकू, गाडीमध्येच सहकाऱ्याला निरोप समारंभ, तिथेच भाज्या निवडत सास बहू सिरीयल वर तावातावाने वादावादी; हे सर्व त्यांच्या इतके अंगवळणी पडले आहे की विचारायची

सोय नाही; महिला स्पेशल ट्रेन म्हणजे तर नुसता उत्साह आणि कल्ला असतो.

खूप सिनेमांमध्ये ट्रेन हा क्लायमॅक्स चा अविभाज्य भाग असतो; त्यातील दोन लक्षवेधी शेवट म्हणजे दिल वाले दुल्हनिया ले जायेंगे मधील सिमरन चे प्रियकरासोबत मिलन व दुसरा बंदिनी मधील नूतन वर चित्रित झालेला शेवट; प्रियकर धर्मेंद्र सोबत ट्रेन मध्ये बसून आयुष्याची नवीन सुरुवात करायची की आपल्या वृद्ध व आजारी असलेल्या जुन्या प्रेमासोबत (अशोक कुमार) बोटीतून परत माघारी फिरायचे या द्विधा मनस्थितीमध्ये नूतन असताना पार्श्वभूमीवर सचिनदेव बर्मन यांचे अप्रतिम गीत **'मेरे साजन है उस पार, मैं मन मार, हूँ इस पार'** वाजत असते व हा सर्वच चित्रपट मग एक नॉस्टॅल्जिया निर्माण करून जातो.

आम्ही मित्राच्या लग्नानिमित्त राजस्थान ला जात होतो तेव्हा डिलक्स एक्सप्रेस ने सवाई माधोपूरला

(ब्रॉडगेज) उतरून सीकर ला जाण्यासाठी मीटर गेज ट्रेन पकडावी लागत असे; डिलक्स लेट झाल्याने आम्हाला अक्षरशः दिल वाले दुल्हनियाच्या स्टाईल मध्ये ती मीटर गेज ट्रेन रात्री दीड वाजता पकडावी लागली होती.


ट्रेन म्हटले की दोन दरोड्यांचा उल्लेख डोळयासमोर यालाच हवा एक इतिहासातील क्रांतिकारकांनी रचलेला काकोरी कट व दुसरा शोले चित्रपटामधील ट्रेन वरील दरोड्याला नाकाम करण्यासाठी इन्स्पेक्टर ठाकूरला मदत करणाऱ्या वीरू व जयचा.

लहानपणी प्रत्येकाला एकदा तरी ट्रेनच्या पटरीवरून चालत जायची इच्छा असते व रुळाला कान लावून दूरवरून येणाऱ्या ट्रेनची चाहूल घेण्याची मनीषा असते; नेमके हेच कुतूहल 'सदमा' चित्रपटामध्ये वेडसर असलेल्या श्रीदेवीच्या मनात येते. **'ए जिंदगी गले लगा ले'** या गाण्यात ट्रेनचे असेच दृश्य रसिकांना पाहायला मिळते; याच चित्रपटाच्या क्लायमॅक्स मध्ये ट्रेनचे दृश्य

आहे जे आपल्याला पार उध्वस्त करून जाते. स्मृती परत आलेली श्रीदेवी आपल्या घरी जात असते पण तिला तिच्या वेडसर आयुष्यातील कमल हसन बद्दल काहीच आठवत नसते; आपले अवघे भावविश्व झालेल्या श्रीदेवीला आपली ओळख पटवून देण्यासाठी कमल हसन जिवाच्या आकांताने प्रयत्न करत असतो; ट्रेन जसजशी मार्गस्थ होत असते तसतशी कमल हसनची तडफड शिगेला पोहचते; आयुष्यात अशी वेळ शत्रूवर देखील यायला नको.

ट्रेन चा नॉस्टॅल्जिया अनुभवायचा असेल तर पावसाळ्यानंतर कोकण ट्रेनचा प्रवास नक्कीच अनुभवला पाहिजे आता तर रेल्वे मंत्रालयाने पारदर्शी टप असलेल्या बोगीची देखील निर्मिती केली आहे. चेन्नई एक्सप्रेस या चित्रपटात धबधब्याच्या पार्श्वभूमीवरील कोकण ट्रेनचा प्रवास पडद्यावर आला आहेच; तेव्हा

चला तर खिसा गरम असेल तर 'डेक्कन ओडिसी' ने प्रवास करा व नॉस्टॅल्जिक व्हा.



**मित्रहो, पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?**

हो! आम्ही म्हणतो वाचनाने माणूस शहाणं होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. प्रत्यक्ष अनुभवासारखा शिक्षक नाहीच. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे. एक एक पुस्तक म्हणजे व्हिटामिनची एक एक गोळी असते असं समजा. शहाणं करून सोडणारं व्हिटामिन. आणि जसे इतरांचे अनुभव तुम्हाला शहाणं करतात तसे तुमचे अनुभव इतरांना सांगून त्यांना शहाणं करायचं काम तुम्ही करू शकता. तुम्ही तुमचे अनुभव लिहून ई साहित्यकडे पाठवा. बाकी सर्व आम्ही बघू.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.